Selection Guaranteed here

# Develop India Group

Visit at : https://www.developindiagroup.co.in/

## You can find here

Current Affairs | Latest Jobs | Syllabus | Admit Cards | Question Papers | cut off | Answer keys | Results

*Develop India Group India's largest online complete study notes providing website. We are providing complete study notes for UPSC Exams and all state civil services examinations like UPPSC, MPPSC, BPSC, JPSC, CGPSC, UKPSC, RAS/RTS etc. Except in these exams we are providing study notes for Judicial, IIT JEE, Engineering and medical entrance, GATE, CSIR, UGC NET, Banking, RRB and SSC exams.*

Visit this site for more : https://www.developindiagroup.co.in/

JMFC (M) Exam - 2017
8/10/2017

I10

201001

2017

**PAPER II**

**पेपर क्रमांक II**

**Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure, SC & ST (Prevention of Atrocities) Act, 1989 and Protection of Civil Rights Act, 1955, Essay on Current Legal Topic**

**इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स ऍक्ट, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, एससी अँड एसटी (प्रिव्हेन्शन ऑफ अॅट्रासिटीज) अॅक्ट, 1989 अँड प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईटस् अॅक्ट, 1955, करंट लिगल टॉपिकवरील निबंध**

*Time : 3 Hours*
*वेळ : 3 तास*

*Max. Marks : 100*
*गुण : 100*

---

***Note :***
***सूचना :***

(1) *Questions No. **9** and **10** are **compulsory**.*
*प्रश्न क्रमांक **9** व **10** अनिवार्य आहेत.*

(2) *Answer any **six** from the remaining questions.*
*उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही **सहा** प्रश्न सोडवावेत.*

(3) *Marks to each question are indicated by a figure in the margin on the right hand side.*
*प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.*

(4) *Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*
*ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

(5) *Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
*उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.*

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."*
*"उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

P.T.O.

(7) ***English*** *version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.*
*कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितित, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) ***All*** *questions can be attempted only in one language either in **English** or in **Marathi** as per the option given in the application form.*
*उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

(9) *Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.*
*उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास, दुसरा उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*

---

1. Discuss the constitution and powers of various criminal courts constituted under the Code of Criminal Procedure, 1973. *10*

फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 नुसार विविध फौजदारी न्यायालयाचे गठन व अधिकार स्पष्ट करा.

---

2. Write notes (any ***two***) : *10*

(a) Bar to take cognizance of certain offence after lapse of the period of limitations

(b) Security for good behaviour from habitual offenders

(c) When fact not otherwise relevant becomes relevant

(d) Stoppage of summons case

टीपा लिहा (कोणत्याही ***दोन***) :

(अ) मुदत मर्यादा उलटून गेल्यानंतर काही गुन्हांची दखल घेण्यास आडकाठी

(ब) सराईत अपराध्यांकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन

(क) एरव्ही संबद्ध नसलेली तथ्ये केव्हा संबद्ध होतात

(ड) समन्स खटला थांबवणे

3. Discuss critically the exceptions enumerated to Section 300 of the Indian Penal Code. *10*

भारतीय दंड संहिता नुसार कलम 300 मधील अपवाद विस्तारीत पणे स्पष्ट करा.

---

4. Write difference between (any ***four***) : *10*

(a) Bail and Anticipatory Bail

(b) Discharge and Acquittal

(c) Police custody and Magisterial custody

(d) Dowry death and Harassment of a woman by husband or his relatives for illegal demands

(e) Forgery and Making of false document

(f) Criminal trespass and House trespass

फरक स्पष्ट करा (कोणतेही ***चार***) :

(अ) जामीन आणि आगाऊ जामीन

(ब) विनादोषारोप सुटका आणि दोषमुक्ती

(क) पोलीस ताबा आणि न्यायालयीन ताबा

(ड) हुंडाबळी आणि बेकायदेशीर मागणीसाठी महिलेच्या नवऱ्याने किंवा त्याच्या नातेवाईकांनी तिला दिलेली क्रूर वागणूक

(इ) बनावटीकरण आणि खोटा दस्तऐवज बनविणे

(फ) फौजदारीपात्र अतिक्रमण व गृह अतिक्रमण

---

5. Discuss law of hearsay evidence and also explain the rationale behind exclusion of hearsay evidence. *10*

ऐकीव पुराव्याचा कायदा स्पष्ट करा व ऐकीव पुरावा वगळण्यामागे तर्क स्पष्ट करा.

---

6. (a) Discuss limitation or jurisdiction of civil courts under the Protection of Civil Rights Act, 1955. *5*

(b) Define 'Economic boycott' under the SC and ST (Prevention of Atrocities) Act, 1989. *5*

(अ) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 अंतर्गत दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेची मर्यादा स्पष्ट करा.

(ब) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, 1989 नुसार 'आर्थिक बहिष्कार' याची व्याख्या करा.

---

7. Write short notes (on any ***four***) : *10*

(a) Electronic Records

(b) Cross Examination of a Witness

(c) Refreshing Memory

(d) Judge's Power under Section 165 of the Indian Evidence Act

(e) Impeaching Credit of Witness

(f) Who May Testify

संक्षिप्त टीपा लिहा (कोणत्याही ***चार***) :

(अ) इलेक्ट्रॉनिक अभिलेख

(ब) साक्षदाराची उलट तपासणी

(क) स्मृतीला उजाळा देणे

(ड) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम मधील कलम 165 नुसार न्यायाधीशांचा प्रश्न विचारण्याचा अधिकार

(इ) साक्षीदाराच्या विश्वासपात्रते बद्दल संशय व्यक्त करणे

(फ) कोणाला साक्ष देता येईल

---

8. Discuss critically the maxim "actus non facit reum, nisi mens sit rea". How far is this maxim reflected in the Indian Penal Code ? *10*

"एक्टस नॉन फॅसिट रीयम, निसि मेन्स सिट रीया" या सिद्धांताची सविस्तर चर्चा करा. हा सिद्धांत भारतीय दंड संहिते मधे किती प्रतिबिंबित आहे ?

---

9. Write an essay on any ***one*** of the following : *20*

(a) Cow Slaughter Ban

(b) Digital India

(c) Demonetisation

खालील कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा :

(अ) गोहत्या बंदी

(ब) डिजिटल इंडिया

(क) चलनबंदी

---

10. Write judgement on the following facts : *20*

A and B were friends. They were having fun in the house of A. Suddenly a quarrel occurred between the two. A assaulted B with a stick on his leg resulting into fracture injury. A assaulted B in the presence of his parents C and D. B went to a hospital and got treatment. Doctor E issued injury certificate showing fracture in right leg.

During trial, B supported prosecution version. However, parents of A i.e., C and D turned hostile. Injury certificate was proved through the Doctor. He also deposed that B was admitted in the hospital with history of assault. B identified the stick by which he was assaulted. There is no independent eye witness to the incident. A took a plea that B himself fell down while running. A also said that he has admitted B in the hospital and argued that had he assaulted B, he would not have admitted B in the hospital.

खालील तथ्यांआधारे निकालपत्र लिहा :

अ व ब मित्र होते. ते अ च्या घरात मौज करीत होते. अचानक दोघांमधे वाद झाला. अ ने ब च्या पायावर लाठी ने वार केला, त्यामुळे त्याचा पाय फ्रेक्चर झाला. अ ने ब ला त्याच्या आईवडील क व ड यांचे समक्ष मारले होते. ब ने दवाखान्यात जाऊन उपचार घेतला. डॉक्टर इ ने ब च्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे इजा प्रमाणपत्र दिले.

सुनावणी दरम्यान ब ने सरकार पक्षाच्या बाजुने साक्ष दिली. परंतु अ चे पालक म्हणजेच क व ड फीतुर झाले. इजा प्रमाणपत्र डॉक्टर चे मार्फत सिद्ध करण्यात आले. त्यांनी हे देखील सांगितले की ब ला दवाखान्यात "हमला केल्याची घटना" या कारणा वरून दाखल केल्याचे नमुद आहे. ब ने त्याला मारलेली काठी ओळखली घटनेला स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. अ ने कथन केले की ब पळतांना स्वत:च पडला. अ ने असेही कथन केले की त्यानेच ब ला दवाखान्यात दाखल केले व युक्तिवाद केला की जर त्याने ब ला मारले असते, तर त्याला दवाखान्यात दाखल केले नसते.

SEAL